# शाश्वत विकासामध्ये आदिवासी संस्कृतीचे योगदान : एक चिकित्सक अध्ययन

**1.संदीप तुंडूरवार**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री. बिंझाणी नगर महाविद्यालय नागपूर
**2.किशोर नैताम**
श्री. बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

**3. डॉ.शुभांगी बोम्पिलवार**
सहाय्यक प्राध्यापक कमिन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग फॉर वूमन, नागपूर

## सारांश –

एकोणिसाव्या शतकातील औद्योगीक क्रांतीनंतर जगात यांत्रिकीकरण आणि कारखानदारीचा वेग वाढत गेला विकासाची गरज भागविण्यासाठी जो एक आकृतिबंध युरोपियन राष्ट्रे व अमेरिका सारख्या देशामध्ये तयार झाला होता त्यात विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वाढता वापर करून माणसाच्या नवनव्या गरजा भागवणारी साधने निर्माण करण्यावर भर दिलेला होता. कापड कारखानदारी ,वाफेची इंजिन, रेल्वे, जहाजे, वीजयंत्रे बल्ब, टेलीफोन यापासून सुरुवात करून पोलाद कारखाने, जल, विधूत प्रकल्प अणुउर्जा प्रकल्प, संगणक आणि माहिती यंत्रणेचे सर्वत्र जाळे पसरले व विज्ञान तंत्रज्ञानाच्या वापराणे सुखोपभोगाची साधने निर्माण करून त्या उत्पादनाच्या वितरणातून मोठ्या प्रमाणावर पृथ्वीवरील नैसर्गिक संसाधनाचा मोठ्या प्रमाणात वापर होऊ लागला. वरचेवर माणसाच्या वाढत जाणाऱ्या गरजा आणि त्यासाठी वाढत जाणारी उत्पादने त्यातून निर्माण होणारी चढाओढीत पृथ्वीवरील नैसर्गिक साधनसंपत्ती माणसाला पुरेल किवा नाही यांचा विचार विकासभिमुख समाजात कुठेही केला गेलेला नाही त्यामुळे भौतिक विकास होत गेला. त्यामुळे नैसर्गिक संसाधनाचा ह्रास

वाढत गेला व आज विकास प्रकीयेचा पुर्नविचार करण्याची जगाला आवश्यक भासली व विकासाला शाश्वतेच्या दृष्टीकोनातून पाहणे आवश्यक झाले. पृथ्वीवरील लोकांना पर्यावरणाचे जतन व संवर्धन करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर टाकहोम येथे परिषद आयोजित केली गेली त्या परिषदेत नंतर भारताने संविधानामध्ये 42 व संशोधन करून कलम 48 मध्ये पर्यावरण वने व वन्यजीव यांचा संरक्षणासाठी व विकासासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करण्याची जबाबदारी राज्याकडे सोपविण्यात आली सर्व जीवित मात्र मानव प्राणी आणि वनस्पती यांच्या अस्तित्वासाठी अत्यावश्यक असलेली पर्यावरण विषयक चिरता व परिस्थितीकीय संतुलन टिकवून वातावरणातील समतोल प्रस्थापित करणे मानव जातीचे अस्तित्व टिकून राहण्यासाठी सद्यस्थितीतील व भविष्यकालीन असलेल्या गरजांची सुरक्षितता अबाधित राहावी यासाठी वन बोनस स्त्रोतांचा शाश्वत वापर आणि या स्त्रोताची निरंतर समृद्धी होणे आवश्यक आहे यासाठी या सर्व स्त्रोतांची सांस्कृतिक बांधिलकी असणाऱ्या समुदाय जो पिढ्यानपिढ्या जल जंगल जमीन या प्राकृतिक दर्शन घडवणाऱ्या आदिवासी संस्कृतीत आढळून येतो आदिवासी संस्कृती निसर्गपूजक असून या संस्कृतीने पर्यंत निसर्गाच्या सानिध्यात राहून पर्यावरणाचे व नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन केले आहे प्रस्तुत शोधनिबंधात नैसर्गिक साधनसामुग्रीचा संसाधनांचे व्यवस्थापन व विकास यामध्ये संतुलन करणारी व्यवस्था म्हणून आदिवासी संस्कृतीकडे पाहण्याची आवश्यकता आहे.

**शब्दकुंजी –** आदिवासी, संस्कृती, पर्यावरण, संशाधने,

**संशोधनाचा उद्देश –**

सदर शोधनिबंधाच्या उद्दिष्टांची मांडणी खालील प्रमाणे करण्यात आली आहे.

१. समकालीन शाश्वत विकासाची संकल्पना अभ्यासणे.

२. आदिवासी संस्कृती शाश्वत विकासाला पूरक आहे काही याची चिकित्सा करणे.
३. शाश्वत विकास आणि आदिवासी संस्कृती यातील सहसंबंध तपासणे.

**संशोधनाचे गृहीतके -**

सदर शोध निबंधासाठी खालील गृहीतकाची माडणी करण्यात आली आहे.

- आदिवासी संस्कृती शाश्वत विकासाला पूरक आहे.

**संशोधन पध्दती -**

कोणतेही संशोधन शास्त्रीय होण्याकरिता संशोधन पध्दतीची आवश्यकत असते. प्रस्तुत शोधनिबंधसाठी दुय्यम, वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. त्यासोबतच ग्रंथ, मासिके, वृत्तपत्रे, शोधनिबंध आणि शाश्वत विकासामध्ये आदिवासी संस्कृतीचे योगदान यासंदर्भात मिळालेल्या माहितीच्या आधारावर सदर शोधनिबंधात मांडणी करण्यात येत आहे.

**प्रस्तावना**

मनुष्याच्या विकासाच्या जडणघडणीत समाजव्यवस्था हा मूलभूत घटक मानला जातो. भारतासारख्या महाविशालकाय देशातील समाजव्यवस्थेचा आणि मानवी जीवन पध्दतीचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, विज्ञानामुळे एकूणच मनुष्यांच्या जीवन पध्दतीत आणि समाजव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडून आले आहे. सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी आर्थिक, तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक घटक महत्वपूर्ण भूमिका पार पाडतात. या प्रकारचे वक्तव्य सोशल अँड कल्चरल डायनामिक्स या ग्रथात सोरोकिन यांनी केले आहे. याला सामाजिक गतीशिलतेचा सिध्दात म्हटले जाते. आधुनिक युगात तंत्रज्ञानाच्या विकासामुळे, संगणक, लॅपटोप, मोबाईल, केबल, टेलिव्हिजन इत्यादी साधनामुळे जग गतिशील झालेले आहे. याचा

परिणाम सांस्कृतिक घटकावर मोठया प्रमाणात झालेला आहे. संस्कृती ही प्रसारणशिल असते. भाषा, साहित्य, शिष्टाचार, तंत्रविज्ञानात्मक ज्ञान, याप्रसारणाच्या साधणामुळे सांस्कृतिक परिवर्तन घडून येत असतात. समाज जीवनात काही दोषपूर्ण स्थितीमध्ये प्रयत्नपूर्वक बदल घडवून आणण्याच्या प्रकियेला सामाजिक परिवर्तन असे म्हणतात. हे परिवर्तन आंदोलन किंवा चळवळीद्वारे घडविले जात असते. सामाजिक परिवर्तनात समायोजन प्रक्रियेला विशेष स्थान प्राप्त झाले आहे. भारतात अध्यापही दुर्गम भागातील काही जमाती विकासाच्या व परिवर्तनाच्या बाजुने आहेत. तर काही जमाती अभिज्ञ आहेत. आदिवासी लोक अन्य जमातीच्या आणि गैरआदिवासी लोकाच्या संर्पकात आल्यानंतर त्यांच्या सामाजिक, सास्कृतिक जीवनात परिवर्तन घडून येतात.

दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक राष्ट्र एकामागोमाग वसाहतवादाच्या दास्यत्वातून मुक्त होऊन स्वतःच्या अस्मितेचा शोध घेऊ लागले. पिढ्यापिढ्या शोषणाच्या बंधना नंतर उध्वस्त झालेल्या अर्थव्यवस्थेची आणि वाढत्या लोकसंख्येचा मेळ बसवण्यासाठी राष्ट्रातील जनतेच्या आशा आकांक्षाची पूर्ती करणे कठीण होते अशावेळी पाश्चात्यीकरण करून पुन्हा वसाहतवादाच्या जाळयात जायचे की नवीन पर्याय शोधायचा असे अनेक प्रश्न निर्माण झाले होते. जर पाश्चिमात्यीकरण केले असते तर युरोपियन राष्ट्रांचे अनुकरण करून गुलामगिरी ची फळे नको होती, म्हणून पाश्चात्यीकरण्याच्या ऐवजी आधुनिकीकरणाची कास धरल्याचे दिसते. आधुनिकीकरण या प्रक्रियेत समाज आपले परंपरागत मूल्य आणि संस्थांना समोरे जाऊन आधुनिक जगाच्या अनुरूप जीवन पद्धती आत्मसात करीत असते. आधुनिक जीवनपद्धती उद्योग आणि तंत्रज्ञान समाजासाठी उपयुक्त असतात या पद्धतीत जगातील मानवांच्या इच्छा-आकांक्षा आणि आवश्यकता पूर्ण करणे उत्पादनाच्या नव्या तंत्र पद्धतीच्या स्वीकार करून जन स्वतंत्रत प्राप्त राष्ट्राने शहरीकरण करणे, उत्पादनाच्या नव्या तंत्र पद्धतीचा वापर

करणे, साक्षरतेचा प्रसार करणे, प्रशिक्षित करणे अशा प्रकारचा हेतू गृहित धरला होता, त्यातून देशातील नागरिकांना आर्थिक संधी उपलब्ध होईल व राष्ट्रातील प्रति व्यक्ती उत्पादनात वाढ होऊन लोकांच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणून त्यांच्या राजकीय प्रक्रियेत व व्यवस्थित सहभाग वाढविणे असा दूर दृष्टिकोण त्यामागचा होता. परंतु युरोपियन राष्ट्रांनी स्वतःचे आधुनिकीकरण करून घेतले आणि तंत्रज्ञान, आचार-विचार, सामाजिक-आर्थिक समस्या, मूल्यव्यवस्था यावर डोळे झाकून संपत्तीचा उपयोग केला. मात्र या आधूनिकिकरणाच्या प्रक्रियेने नवस्वतंत्र राष्ट्राचां भ्रमनिरास झाला. त्यातून विकास हा लोकाभिमुख न होता जनता या प्रक्रियेपासून दुरावली गेली.

आधुनिकीकरण आणि विकास यातून निर्माण झालेला असमतोल विकास सर्वसामान्य जनतेला नकोसा होता. आर्थिक विकास काही प्रमाणात झाला तरी सामाजिक न्यायाची मात्र पिछेहाट झाली होती. आधुनिकीकरणाच्या अनुकरण वादी धोरणाने नवोदित राष्ट्रीय स्वावलंबी तर बनलेच नाही पण नवे तंत्रज्ञान भांडवली वस्तूंची आयात आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष विश्व बँक यांचे कर्ज घेणे व दुसऱ्या बाजूला आपल्या देशातील नैसर्गिक साधन संपदाचा अतोनात वापर अशा दोन्ही दृष्टचक्रात नवोदित राष्ट्रीय गुंतत गेले. त्यामध्ये भारत देश पण स्वतःला वेगळे ठेवू शकला नाही. यातून जो काही विकास होत होता तो चिरकाल टिकणारा आणि भविष्याचा वेध घेणारा नव्हता तर तो तात्पुरत्या स्वरूपाचा होता. कारण त्या मध्ये पर्यावरणाचा अमाप उपयोग करून निसर्गावर मात करण्यासाठी पाऊल उचललेले दिसून येते.[१] म्हणूनच विकास आणि आधुनिकीकरणाचे नवीन प्रारूप शोधण्याची आवश्यकता भासली जेणेकरून सर्व जीवन सृष्टी आणि भावी पिढ्यांना विकासाची चव चाखायची असेल तर शाश्वत विकासाची कास धरावी लागेल. आदिवासी संस्कृती मध्ये हे शाश्वत

विकासचे नवे प्रारुप अमलात आणण्यासाठी नवीन शोध घेणे आवश्यक वाटते.

## गोषवारा -

### शाश्वत विकास -

शाश्वसता म्हणजे अशी अवस्था की जी थोडा किंवा अनंत काळापर्यंत टिकून राहते.[२] इंटरनॅशनल युनियन फॉर कंजर्वेशन ऑफ नेचर अंड नॅचरल रिसोर्सेस या संस्थेने सन 1991 मध्ये शाश्वतता म्हणजे सजीव परिस्थितीकीत किंवा नैसर्गिक स्त्रोतांचा असा वापर करणे जो पुढे भरून काढल्या जाईल. जो विकास चालू पिढ्यांच्या गरजाची पूर्तता करून पुढील पिढीच्या गरजा धोक्यात न आणता पूर्ण करतो अशा विकासाला शाश्वत विकास म्हणता येईल. जो विकास मानवांच्या सध्याच्या व भविष्यातील गरजांची संतुलित कृती करतो तोच शाश्वत विकास होय. सन 1972 ला संयुक्त राष्ट्राच्या स्टॉकहोम येथील परिषदेत औद्योगिक व विकसनशील राष्ट्रांमध्ये मानवी कुटुंबाचे आरोग्य व उत्पादक पर्यावरणासाठी असणारे हक्क ठरविण्याबाबत एकमत झाले. 'इंटरनॅशनल युनियन फार कंजर्वेशन ऑफ नेचर' ने सन 1980 मध्ये प्रसिद्ध केलेल्या जागतिक संवर्धन रणनीती मध्ये शाश्वत विकास संदर्भात पर्यावरण संवर्धन आणि विकास यामधील परस्परावलंबन सूचित करण्यात आले होते.[३] कोट्यावधी लोकांना गरिबीतून बाहेर काढण्यासाठी विकास आवश्यक असून विकासासोबतच निसर्गाचे संवर्धन केल्याशिवाय विकास होणार नाही ही रणनीती नैसर्गिक स्रोतांच्या संरक्षण करणाऱ्या आयु. सी. एन. या आंतरराष्ट्रीय संघटनेने प्रसिद्ध केलेली आहे.

शाश्वसतेची संकल्पना सामान्यपणे चार पैलूशी निगडित आहे.

१) पर्यावरणीय

२) आर्थिक

3) सामाजिक
४) संस्थात्मक शाश्वतता

वरील पैकी जरी एखादे पैलू दुर्लक्षित झाले, तरी समाजाची प्रगती खुंटेल आणि समाजाच्या अस्तित्वाला बाधा येईल. पर्यावरणीय शाश्वतता म्हणजे प्राणी व इतर सजीवांना आवश्यक वस्तू व सेवा पुरवत राहण्याची परिसंस्थेची क्षमता होय. एखाद्या समाजाची सांस्कृतिक व आर्थिक अवस्था टिकून राहणे किंवा पृथ्वीवरील नैसर्गिक स्त्रोतांचे संरक्षण व संवर्धन करणे अपेक्षित आहे. सुरवातीच्या काळात नैसर्गिक संसाधनाची विपुलता होती. काळानुसार लोकसंख्या वाढत गेली. तत्रविज्ञानाच्या प्रगती बरोबरच मनुष्यांचा उपभोग घेण्याचा स्तरही उंचावत गेला आहे. एवढेच नव्हे तर सर्वसामान्य जीवनामध्ये कृत्रिम साधनाचे प्रयोग इतके वाढले की त्यामुळे निसर्गच दूषित होऊ लागला आहे. निसर्गापासून मनुष्य दूर जाऊ लागला आहे. आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्याच्या धावपळीत पर्यावरणाच्या विनाशाकडे दुर्लक्षित झाले आहे. [४]

जगभरात झालेल्या औद्योगीकरण आणि त्यातून निर्माण झालेले आधुनिकीकरण यामुळे विकासाच्या प्रारूप बदलू लागले. प्रत्येक राष्ट्र विकासाच्या पडद्याआड नैसर्गिक साधन संपदांचा अमाप प्रमाणात वापर करू लागला आहे. त्यातून पर्यावरण संवर्धन आणि विकास या दोन्ही संकल्पनाचा मेळ घालण्याच्या दृष्टीकोनातून शाश्वत विकासाच्या नवीन परिभाषेची गरज भासली. जगाच्या व्यासपीठावर सर्वात पहिले ‘क्लब ऑफ रोमन’ वाढीच्या मर्यादा या नावाखाली अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालात साधनसंपत्तीच्या अतिरिक्त वापरामुळे ‘आपले भविष्य कसे अंधकारमय समस्यायुक्त होत आहे’, याप्रकारचा दृष्टीक्षेप टाकून विकासवादी जगाला संदेश दिला आहे. [५]

**जग – शाश्वत विकास -**

जागतिक पर्यावरण व विकास आयोग (world commission on environment and development) संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेची स्वतंत्र संस्था म्हणून कार्य करीत आहे. पृथ्वीवरील सामाजिक पर्यावरणीय समस्याचे निरीक्षण करून त्यावर वास्तववादी उपाय योजनासाठी आणि पृथ्वीवरील संसाधने पुढील पिढ्यांसाठी राखून त्यांचा उपयोग चालू पिढीसाठी शाश्वतरित्या कसा करता येईल, यासाठी उपायोजना सोधण्याचे कार्य युनोने दिले आहे. सदर आयोग बँन्ड लँड आयोग म्हणून ओळखल्या जातो. सदर आयोगाची शाश्वत विकासाच्या संदर्भात सर्वमान्य उद्दिष्टे आहेत. ती अशी –

1) विकासाचे पुनरुज्जीवन
2) विकासाचा दर्जा सुधारणे
3) रोजगार अन्न ऊर्जा पाणी आणि स्वच्छता याबाबतीत गरजा पूर्ण करणे
4) संसाधानाचे रक्षण आणि संवर्धन करणे
5) तंत्रज्ञानाचा वापर करणे
6) निर्णयप्रक्रियेमध्ये पर्यावरण व अर्थशास्त्र चा समावेश करणे

सदर आयोगाने सांगितलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शाश्वत विकासाच्या माध्यमातून विकास हा पुढील पिढीसाठी समृद्ध व परिपूर्ण कसा राहील ? यावर उहापोह केलेला आहे. मानवाची प्रत्येक पिढी नैसर्गिक संसाधनाचा विकास व ऱ्हास करीत असते. संशोधनाच्या वापरात आणि ऱ्हासाच्या गुणोत्तरा मध्ये मोठी तफावत दिसून येत आहे. अशाच प्रमाणात हे सुरू राहिले तर आर्थिक विकास थांबेल. त्यासाठी जागतिक स्तरावर "वर्ल्ड वाइड वेब फॉंर नेचर इंटरनॅशनल युनियन फॉंर कंजर्वेशन ऑंफ नेचर" या सारख्या विविध संघटनांच्या माध्यमातून शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी संशाधनाचा मर्यादीत वापर किंवा पुनर्वापर करणे, पारंपारिक सौर ऊर्जा, कोळसा, खनिज तेल, नैसर्गिक वायू, पर्यावरण व आर्थिक विकासातील संतुलन करून जल, जंगल, जमीन

इत्यादी साधनसंपत्तीचे व्यवस्थापन आणि सामाजिक निकषासोबत त्यांचा समतोल साधने आवश्यक आहे. निसर्गाचे नुकसान करून मानव जातीचा शाश्वत विकास साधता येणार नाही. प्रत्येक नागरिक आपली जीवनशैली पर्यावरण पूरक ठेवण्याचा प्रयत्न करतो. मानवी व नैसर्गिक संसाधनाधिष्ठित विकासातील प्रतिमानात मानवी समुदाय सामावलेला आहे.

## आदिवासी संस्कृती –

भारतीय संविधानातील कलम ३४१व ३४२ मध्ये केलेल्या तरतूदीनुसार आदिवासीना 'अनुसूचित जनजाती' संबोधल आहे. काही ठिकाणी वनवासी गिरीजन जमात असाही उल्लेख आढळतो. भारतात एकूण १७८ आदिवासी जमातीची नोंद झालेली असून २००१ च्या जनगणेनुसार देशात ८.४३ कोटी आदिवासी लोकसंख्या आहे प्रमाण एकूण लोकसंख्या ८.२ आहे साधारणपणे एकूण आदिवासीच्या प्रमाणात १३ भारतीय व्यक्ती आहेत. १९९१ च्या जनगणेनुसार भारतात आदिवासीची संख्या ६.७५८ कोटी होती. ही लोकसंख्या इंग्लडच्या लोकसंख्येबरोबर होती.

जन्मानंतर, मानवी शिशुवर मानवनिर्मित वातावरणाचा प्रभाव पडतो. या वातावरणात साधने, घरे, फर्निचर, मूर्त वस्तूसोबतच, धार्मिक आचरण, परंपरा, विचार आणि ज्ञानासह अमूर्त वस्तूचा देखील समावेश होतो. या सर्व गोष्टींचे स्वरूप केवळ आजच्या संस्कृतीद्वारे ठरवले जाते. ज्या समाजात एखादी व्यक्ती जन्माला येते, त्या समाजातील संस्कृतीचा प्रभाव व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर निश्चित प्रभाव पाडतो. आणि व्यक्ती संस्कृतीच्या मध्यभागी राहते, मग ती मूर्त असो वा अमूर्त असो.[६] अशाच प्रकारे आदिवासी जमात म्हणून ओळख पावलेली एक जमात या भूपृष्ठावर आहे. 'धरतीची लेकरे निसर्गाच्या कुशीत जीवन जगणारी, जंगलाच्या झाडाझुडपातून, पर्वतांच्या दऱ्याखोऱ्यातून, त्यांच्या पाऊलवाटा गवसणारी जमात म्हणजे

'आदिवासी' होय. ७ आदिवासी समाज हा हजारो वर्षापासून संकटांना तोंड देत आपले जीवन व्यतीत करीत आहे. आदिवासी संस्कृतीचे स्वरूप समजून घेण्यासाठी या जमातीतील धार्मिक व्यवस्था हे मुलत: निसर्गवादी आहे. निसर्गातील प्रत्येक वस्तू एक शक्ती असते, आणि त्या शक्तीला मानवी जीवनात काहीतरी स्थान असते. असे भारतातीलच नाही तर जगातील आदिवासी समुदायात असल्याचे अभ्यास आढळून आले आहे. आदिवासी समुदायातील लोक निसर्गातील अलौकिक शक्तीची पूजा करून मानवाच्या सर्व मूळ प्रश्नाचे उत्तरे धर्माच्या द्वारे प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत असतात. आदिवासी संस्कृतीचे दर्शन त्यांच्या दैनंदिन वापराच्या वस्तू आणि आहार या निसर्गातील मिळणाऱ्या वस्तू पासून पूर्ण करीत असतात. त्यामध्ये बांबू पासून अनेक टिकाऊ वस्तू बनवले जातात. तसेच आदिवासींचे जीवन कंदमुळे, फळे, फुले, रानभाज्या, मांस इत्यादीवर अवलंबून असते. मात्र या संस्कृतीत या सर्व घटकांचा वापर करीत असताना आदिवासी जमात निसर्गावर पुत्राप्रमाणे प्रेम करीत असते.[८]

**आदिवासीच्या विकासाची व्याप्ती –**

आदिवासींच्या विकासाचा एकुण संबंध एका अर्थाने ग्रामीण विभागाच्या विकासाशी आहे. यामध्ये आदिवासी लोकांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारणे किंवा त्यामध्ये गुणात्मक वृद्धी घडवून आणणे हे अपेक्षित आहे. त्यामुळे या समाजाला विकासाची संधी मिळेल आणि त्यातून त्यांचे जीवनमान उंचावू शकेल. आदिवासी विकासाच्या प्रक्रियेत सामाजिक न्याय, शिक्षण, रोजगार, वित्तीय मदत, ग्रामीण स्वच्छता व आरोग्य, निवारा, पर्यावरण व सुरक्षा यांचा समावेश होतो. आदिवासीच्या व्याप्तीत पुढील बाबींचा समावेश होतो.

१. **शेती व सलंग्न सेवा व्यवसायांचा विकास –** आदिवासी व ग्रामीण विकास हि व्यापक संकल्पना असून त्यात शेती, शेती संलग्नित

व्यवसाय, ग्रामोद्योग, वाहतूक व दळणवळण, वने पर्यावरण आरोग्य यासारख्या बाबींचा समावेश होतो.

२. **लोकांचा संघटीत सहभाग –** आदिवासी व ग्रामीण विकासाची प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्याच्या हेतूने शासन, स्वयंसेवी संस्था व आदिवासी समाजाच्या सुधारित प्रयत्नाची गरज आहे. त्याचप्रमाणे केवळ शासनाचे प्रयत्न पुरेशे नसून आदिवासी विकासाच्या कार्यक्रमात लोकांचा संघटीत सहभाग असणेही गरजेचे आहे. तरच आदिवासीचा विकास घडवून आणता येईल.

३. **जीवनाश्यक वस्तूची पूर्तता –** आदिवासी समाजात दारिद्र्याचे प्रमाण सर्वात अधिक आहे. आदिवासी विकास कार्यक्रमात दारिद्र्य निर्मुलन हा मुख्य हेतू असतो. त्यामुळे गरीब रेषेखालील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी किंवा त्यांना दारिद्र्य रेषेच्या वर आणण्यासाठी विशेष भर देण्याचा कार्यक्रम घेतला आहे. त्याकरिता किमान अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य या जिवनावश्यक गरजांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला जातो.

४. **प्रभावी नेतृत्व –** आदिवासी विकासासाठी आदिवासी जनतेतूनच प्रमाणिक व समर्पित नेतृत्व निर्माण होणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे नेतृत्व उदयास येण्यासाठी प्रयत्न केला जातो. कारण जोपर्यंत आदिवासी समाज स्वत:हून पुढे येत नाही. तोपर्यंत त्यांचा विकास साध्य होणार नाही. म्हणून प्रमाणिक दूरदृष्टीचे नेतृत्व निर्माण करणे आदिवासी विकासात अभिप्रेत आहे.

५. **प्रशिक्षण वैज्ञानिक पद्धतीचा आधार –** शेती व शेतीसलग्न व्यवसाय, ग्रामोद्योग इत्यादीवर विकास प्रक्रिया अवलंबून असते. या घटकांच्या उत्पादकतेत वाढ करण्यासाठी वैज्ञानिक पद्धतीच्या वापरास उत्तेजन देण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाची ओळख करून देणे, त्यांचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देणे आणि प्रशिक्षणाद्वारे ग्रामीण कारागिराच्या व अन्न व्यासायीकांच्या कौशल्यात वाढ करणे यात समाविष्ट आहे.

६. **पारंपारिक विचारसरणीत बदल –** आदिवासी समाजात चालीरीती परंपरा यांचा सर्वात जास्त पगडा आहे. त्यामुळे या समाजात नवीन बदलांचा सहजासहज स्वीकार होत नाही. आदिवासी विकासात ग्रामीण जीवनांची पुनर्रचना तसेच लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनमानात सुधारणा व त्यांच्या पारंपारिक विचारसरणीत विकासाला अनुकूल असे आमुलाग्र परिवर्त अपेक्षित आहे. यावरून असे स्पष्ट होते की, आदिवासी विकासात शेती, शेतीपूरक उद्योगांचा विकासात शेती, शेतीपूरक उद्योगांचा विकास, शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी असा सामाजिक गरजांचा व सुविधांचा विकास आणि सांस्कृतिक व वैचारिक दृष्टीकोनात बदल घडवून आणणाऱ्या प्रक्रियेचा समावेश होतो. एकंदरीत नैसर्गिक परिस्थितीत जमीनधारणा पद्धती, शेतीजमिनीचा आकार, जलसिंचन, यांत्रिकीकरण, स्वयंरोजगार, जोडव्यवसाय, सुधारित साधनाचा वापर करणे, शेतमजूर, कारागीर, ग्रामीण उद्योग, पशुपालन, पर्यावरण, जंगले, नैसर्गिक व मानवी साधनाच्या विकासाचा कार्यक्रम इत्यादीचा आदिवासी विकासात समावेश होतो.

७. **वनौषधी –** जंगल भागात कंदमुळे, भाज्या, फळझाडे नैसर्गिकरीत्या उपलब्ध आहेत. त्याचबरोबर हरदुले, कांदे, मटाळू, ममनाल, अंबाडी, पुनर्वा, तांदुळजा, मोह, चार, आवळा, टेभरून, माहूल, हर्रा, बहेडा, गिंड, लाख, सालबीज इत्यादी वनस्पती, वेलीयुक्त वनऔषधी ह्या सर्वांचा उपयोग स्वास्थ संवर्धनासाठी करून घेतल्यास कुपोषणासारख्या प्रश्नावर पर्याय ठरू शकतो. कमीत कमी पैशात उपलब्ध साधन संपतीचा वापर करून आपले आरोग्य व पैशाची बचत होऊ शकते. यावर प्रकिया करणारे उद्योग निर्माण केल्यास रोजगाराला मदत होऊ शकते. येथील जंगलातील व परिसरातील असलेल्या वनऔषधीचे शास्त्रोक्त पद्धतीने संकलन करून वनौषधीचा उपयोग करणाऱ्या उद्योगांना संधी दिल्यास हा एक नियमित वनाधारित निर्मितिचे प्रमुख साधन म्हणून खेड्यातील

जनतेसाठी उपलब्ध होऊ शकेल. येथील आदिवासी जगात अनेक वर्षापासून पांरपारिक वनऔषधीचा उपयोग करीत आहे.[९]

आदिवासीच्या सांस्कृतिक बदलामुळे श्वाश्वत विकास झाला आहे. आदिवासी समाजव्यवस्थेचे सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक इत्यादी विविध पैलू आहेत. अर्थव्यवस्था हा समाजाचा एक पैलू आहे. जमातीच्या अर्थव्यस्थेचे वर्गीकरण करतांना विकासवादी विचारसरणीचा प्रभाव स्पष्टपणे आढळतो. आदिवासी समाजाची अर्थव्यवस्था ही इतर समाज व्यवस्थेच्या मानाने वेगळी आहे. इतर समाजाच्या तुलनेत आर्थिकदृष्ट्या आदिवासी अतिशय मागास आहे. प्रत्येक व्यक्तीच्या आर्थिक स्थितीचा प्रभाव त्या वस्तूंच्या उत्पादनाचा प्रमुख आधार आहे. उदरनिर्वाहासाठी आवश्यक गरजा पूर्ण करणे हेच आदिवासींचे आर्थिक क्रियेचे उद्दिष्ट आहे. आजचे युग मृद्राप्रधान अर्थव्यवस्थेचे आहे. मुद्राप्रधान अर्थव्यवस्थेच्या तुलनेत आदिवासी अर्थव्यवस्थेत पैशाचा अभाव असणे हे विचित्र वाटते. परंतु ही वस्तुस्थिती आहे. आदिवासी उद्योगात अर्थव्यस्थेत विशेषीकरण दिसून येत नाही. प्रत्यक्षात आजची बाजारपेठ त्यावरच चालत आहे. व्यवसायाच्या दृष्टीने शिकार आणि शेती या गोष्टी व्यतिरिक्त आदिवासींनी समाजाला इतर उद्योग धंदे प्रस्तापित करण्याची नामी संधी निर्माण करून दिली आहे.

**निष्कर्ष –**

१. आदिवासी संस्कृतीमुळे सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनामुळे श्वाश्वत विकासाला चालना मिळाली आहे.

२. आदिवासीनी विज्ञानाच्या युगातही आपल्या चालीरीती, परंपरा या सुरूच ठेवल्या आहेत, त्यामुळे त्यांचा परिणाम समाजमाध्यमावर मध्यम स्वरूपाचा झाला आहे.

३. आदिवासींनी जनसंवाद माध्यमाचा उपयोग केल्यामुळे त्यांच्या सांस्कृतिक पैलूत विविध अंगाने बदल घडून आले आहेत.

४. आदिवासी संस्कृती ही निसर्गप्रेमी असल्यामुळे आधुनिक युगात उद्भवलेल्या समस्यांचा सामना करण्याकरिता इतर लोक आदिवासींच्या मूळ संस्कृतीकडे वळले आहेत.

५. वनावर आधारित उद्योगामुळे जगातील राज्ये आर्थिकदृष्ट्या मजबूत झालेली आहेत, त्याचे श्रेय हे आदिवासीच्या वनछादित कार्यक्रम व धोरणांना दिले जाते.

६. जल, जंगल, जमीन या त्रिसूत्रीवर आधारतीत आदिवासींचे जनजीवन सुरु आहे, या त्रिसूत्रीचा परिणाम वेगाने सामाजिक, आर्थिक, राजकीय घटकावर होत आहे.

७. 'जूण ते सोन' ही म्हण आदिवासीच्या अनादी काळापासून सुरु असलेल्या अनेक बाबींचे प्रतिबिंब श्वाश्वत विकासस पूरक आहेत.

**संदर्भ –**

१. द.ना. धनागरे, विकास प्रक्रिया आणि पर्यावरणाचे प्रश्न, लेखमाला, पृक्र. १४

२.https://uofa.rulmr/globauizaciya_sociokultumyh_processorglobalizaciya_socialtumyh,17/10/2021-10,53am

३.https://www.dompsc.con/environment/sustainable.development.php.15/10/2021. 3.31 pm

४. सोमदेव माणिक, शाश्वत विकासासाठी पर्यावरण संरक्षण, Interlink Research analysis vol.vi.issue vii jun-2013

५.https://uofa.rulmr/globauizaciya_sociokultumyh_processorglobalizaciyasocialtumyh,17/10/2021-10,53am

६. Gillin,john,the way of man,p.248

७. संदर्भ डॉ. गोरे, गोविंद, आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन, अमृत प्रकाशन, औरंगाबाद, पृक्र. ११
८. संपा. अनुज लुगुन, आदिवासी अस्मिता प्रभुत्व और प्रतिरोध, अनन्य प्रकाशन, दिल्ली, २०२१ पृक्र. १०१
९. (http://www.lokorabha.com/20110506/samuhik.htm)